# पर्यावरणविषयक जाणीवनिर्मिती चित्रपट महोत्सवातून व्हावी

## ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक आनंद पेंटर : शिवाजी विद्यापीठात 'स्पार्क फिल्म फेस्टिव्हल'चे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. २ : नवोदित चित्रपटकर्मींमध्ये पर्यावरणविषयक जाणीव निर्मितीसाठी स्पार्क चित्रपट महोत्सव महत्त्वाची नांदी ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक आनंद पेंटर यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठाचा बी. ए., फिल्म मेकिंग विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन लिमिटेड आणि लक्ष्मी फाउंडेशनतर्फे होत असलेल्या 'स्पार्क फिल्म फेस्टिव्हल-राज्यस्तरीय पर्यावरण लघुपट/माहितीपट स्पर्धा २०२५' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी, तर किर्लोस्कर कंपनीचे अधिकारी रमेश चव्हाण, हरिष सायवे, शरद आजगेकर प्रमुख उपस्थित होते. दोनदिवसीय महोत्सवात राज्यभरातून आलेले, एकूण २६ लघुपट व माहितीपट दाखविले जाणार आहेत.

पेंटर म्हणाले, 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांच्या प्रेरणेतून कोल्हापूर हे कलापूर म्हणून प्रसिद्धीला आले. अनेक नामवंत कलाकारांची देणगी या शहराने जगाला दिली. चित्रपटसृष्टीचे मध्यवर्ती केंद्र म्हणून कार्य करताना ते प्रयोगशीलतेचे कोल्हापूर स्कूल ठरले. आता चित्रपटसृष्टी राज्यभरात पसरली असताना कोल्हापूरच्या चित्रपटदृष्टीला गतवैभव मिळवून देण्याची जबाबदारी नव्या पिढीने घ्यायला हवी. चित्रपट उद्योगाला चांगल्या, कुशल व प्रतिभावान कलाकारांची नितांत आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांनी भोवतालाकडे संवेदनशीलतेने पाहायला हवे. समर्पणशीलवृत्तीने या क्षेत्रात काम करायला हवे.'



ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक आनंद पेंटर.

### उपक्रमांना पाठबळाची अपेक्षा

■ किर्लोस्कर कंपनीचे अधिकारी रमेश चव्हाण यांनी स्पार्क फिल्म फेस्टिव्हलमधील सर्वोत्कृष्ट लघुपटांना किर्लोस्करच्या वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित करण्यात येतील, अशी ग्वाही दिली. सायवे यांनी किर्लोस्करतर्फे होत असलेल्या विविध जनजागृतीपर उपक्रमांना विद्यापीठाचे सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. जाधव म्हणाल्या, 'विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या पायाभूत सुविधांचा विद्यार्थ्यांना वापर करावा. त्यांच्या व्यक्तिगत ऊर्जेला त्यातून दिशा मिळणार आहे. त्यांनी ज्ञानाच्या कक्षा वाढविताना त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटविण्यासाठी सिद्ध व्हावे.'

याप्रसंगी डॉ. बापू चंदनशिवे, डॉ. अनमोल कोठडिया, अनुप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील, डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते. विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. जान्हवी लायकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. साक्षी वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले. स्मित कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 3 JAN 2026
जनप्रवास

# कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीत 'सुवर्णकाळ' आणूया

## आनंद पेंटर : शिवाजी विद्यापीठात पर्यावरणविषयक स्पार्क चित्रपट महोत्सवाला प्रारंभ

**जनप्रवास : कोल्हापूर**

कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला पुन्हा सुवर्णकाळ प्राप्त करून देण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे. नवोदित चित्रपटकर्मीमध्ये पर्यावरणविषयक जाणीवा निर्मितीच्या दृष्टीने स्पार्क चित्रपट महोत्सव हा महत्त्वाची नांदी ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक आनंद पेंटर यांनी शुक्रवारी येथे केले.



**शिवाजी विद्यापीठात आयोजित स्पार्क फिल्म फेस्टीव्हलच्या उद्‌घाटन प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासमवेत डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. अनमोल कोठडिया, आनंद पेंटर, हरिष सायवे, रमेश चव्हाण, शरद आजगेकर, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. बापू चंदनशिवे.**

शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. फिल्म मेकिंग विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन लि. आणि लक्ष्मी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्पार्क फिल्म फेस्टीव्हल- राज्यस्तरीय पर्यावरण लघुपट, माहितीपट स्पर्धा-२०२५'च्या उद्‌घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या, तर किर्लोस्कर कंपनीचे अधिकारी रमेश चव्हाण, हरिष सायवे आणि शरद आजगेकर प्रमुख उपस्थित होते. दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात राज्यभरातून आलेले एकूण २६ लघुपट आणि माहितीपट प्रदर्शित केले जाणार आहेत.

रमेश चव्हाण, हरिष सायवे यांनी माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, विद्यापीठाने विद्यार्थ्यांना आवश्यक अशा सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्या सुविधांचा वापर विद्यार्थी त्यांच्या व्यक्तिगत ऊर्जेने कितपत वापरतात, हा भाग फार महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःचे क्षमतावर्धन करीत असताना उपलब्ध सुविधांचा पुरेपूर लाभ घेत आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढवाव्यात आणि चित्रपटसृष्टीत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन केले. यावेळी डॉ. जाधव यांनी आपल्या कुटुंबियांचा मा. विनायक, बेबी नंदा यांच्याशी असलेल्या स्नेहबंधांच्या आठवणींनाही उजाळा दिला.

सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले. विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. जान्हवी लायकर यांनी परिचय करून दिला. साक्षी वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले, तर स्मित कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. बापू चंदनशिवे, डॉ. अनमोल कोठडिया, लेखक-दिग्दर्शक अनुप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील, डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह राज्यभरातून आलेले लघुपट-माहितीपट द्रिग्दर्शक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 3 JAN 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला सुवर्णकाळ प्राप्त करून देऊया

## आनंद पेंटर; विद्यापीठात स्पार्क चित्रपट महोत्सवाला प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला पुन्हा सुवर्णकाळ प्राप्त करून देण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे. नवोदित चित्रपटकर्मींमध्ये पर्यावरणविषयक जाणीवा निर्मितीच्या दृष्टीने स्पार्क चित्रपट महोत्सव हा महत्त्वाची नांदी ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक आनंद पेंटर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. फिल्म मेकिंग विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन आणि लक्ष्मी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्पार्क फिल्म फेस्टिव्हल-राज्यस्तरीय पर्यावरण लघुपट, माहितीपट स्पर्धा-२०२५'च्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. किर्लोस्कर कंपनीचे अधिकारी रमेश चव्हाण, हरिष सायवे व शरद आजगेकर प्रमुख उपस्थित होते. महोत्सवात २६ लघुपट, माहितीपट प्रदर्शित केले जाणार आहेत.

आनंद पेंटर म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज व राजाराम महाराज यांच्या प्रेरणेतून कोल्हापूर हे कलापूर म्हणून प्रसिद्धीला आले. अनेक नामवंत कलाकारांची देणगी या शहराने जगाला दिली. चित्रपटसृष्टीचे मध्यवर्ती केंद्र म्हणून कार्य करताना ते प्रयोगशीलतेचे कोल्हापूर स्कूल ठरले. आता चित्रपटसृष्टी राज्यभरात पसरली असताना कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला गतवैभव मिळवून देण्याची जबाबदारी नव्या पिढीने घ्यायला हवी. चित्रपट उद्योगाला चांगल्या, कुशल आणि प्रतिभावान कलाकारांची नितांत आवश्यकता आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्पार्क फिल्म फेस्टिव्हलच्या उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. समवेत डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. अनमोल कोठाडिया, आनंद पेंटर, हरिष सायवे, रमेश चव्हाण, शरद आजगेकर, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. बापू चंदनशिवे.

(छाया : पप्पू अत्तार)

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी स्वतःचे क्षमतावर्धन करीत असताना उपलब्ध सुविधांचा पुरेपूर लाभ घेत आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढवाव्यात आणि चित्रपटसृष्टीत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविण्यास सिद्ध व्हावे.

रमेश चव्हाण, हरिष सायवे यांनी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. जान्हवी लायकर यांनी परिचय करून दिला. साक्षी वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले. स्मित कांबळे यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. बापू चंदनशिवे, डॉ. अनमोल कोठाडिया, लेखक-दिग्दर्शक अनुप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील, डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. ३ जानेवारी २०२६

0 3 JAN 2026
महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road, Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur. Mob.- 9175089609

# कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला सुवर्णकाळ प्राप्त करून देऊ या : आनंद पेंटर

## शिवाजी विद्यापीठात पर्यावरणविषयक स्पार्क चित्रपट महोत्सवाला प्रारंभ

**कोल्हापूर : (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज):**

कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला पुन्हा सुवर्णकाळ प्राप्त करून देण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक आनंद पेंटर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. फिल्म मेकिंग विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन लि. आणि लक्ष्मी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्पार्क फिल्म फेस्टीव्हल-राज्यस्तरीय पर्यावरण लघुपट/ माहितीपट स्पर्धा-२०२५'च्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या, तर किर्लोस्कर कंपनीचे अधिकारी रमेश चव्हाण, हरिष सायवे आणि शरद आजगेकर प्रमुख उपस्थित होते. दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात राज्यभरातून आलेले एकूण २६ लघुपट आणि माहितीपट प्रदर्शित केले जाणार आहेत.

आनंद पेंटर म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि राजाराम महाराज यांच्या प्रेरणेतून कोल्हापूर हे कलापूर म्हणून प्रसिद्धीला आले. अनेक नामवंत कलाकारांची देणगी या शहराने जगाला दिली. चित्रपटसृष्टीचे मधयवर्ती केंद्र म्हणून कार्य करताना ते प्रयोगशीलतेचे कोल्हापूर स्कूल ठरले. आता चित्रपटसृष्टी राज्यभरात पसरली असताना कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला गतवैभव मिळवून देण्याची जबाबदारी नव्या पिढीने घ्यायला हवी. चित्रपट उद्योगाला चांगल्या, कुशल आणि प्रतिभावान




कलाकारांची नितांत आवश्यकता आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. फिल्म मेकिंग विभाग मोठे काम करीत आहे, ही महत्त्वाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या भोवतालाकडे संवेदनशीलतेने पाहायला हवे आणि समर्पणशील वृत्तीने या क्षेत्रात काम करायला हवे, तरच यशाच्या दिशेने वाटचाल करणे शक्य आहे.

रमेश चव्हाण यांनी स्पार्क फिल्म फेस्टीव्हलमधील सर्वोत्कृष्ट लघुपटांना किर्लोस्करच्या वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित करण्यात येईल, असे सांगितले. तर, हरिष सायवे यांनी किर्लोस्करतर्फे घेण्यात येत असलेल्या विविध जनजागृतीपर पर्यावरणपूरक उपक्रमांना शिवाजी विद्यापीठाचे सहकार्य लाभावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, विद्यापीठाने विद्यार्थ्यांना आवश्यक अशा सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्या सुविधांचा वापर विद्यार्थी त्यांच्या व्यक्तीगत ऊर्जेने कितपत वापरतात, हा भाग फार महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःचे क्षमतावर्धन करीत असताना उपलब्ध सुविधांचा पुरेपूर लाभ घेत आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढवाव्यात आणि चित्रपटसृष्टीत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन केले. यावेळी डॉ. जाधव यांनी आपल्या कुटुंबियांचा मा. विनायक, बेबी नंदा यांच्याशी असलेल्या स्नेहबंधांच्या आठवणींनाही उजाळा दिला.

सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. जान्हवी लायकर यांनी परिचय करून दिला. साक्षी वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले, तर स्मित कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. बापू चंदनशिवे, डॉ. अनमोल कोठडिया, लेखक-दिग्दर्शक अनुप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील, डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह राज्यभरातून आलेले लघुपट-माहितीपट दिग्दर्शक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 3 J.'' 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला सुवर्णकाळ प्राप्त करून देऊ या : आनंद पेंटर

## शिवाजी विद्यापीठात पर्यावरणविषयक स्पार्क चित्रपट महोत्सवाला प्रारंभ

कोल्हापूर : कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला पुन्हा सुवर्णकाळ प्राप्त करून देण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे. नवोदित चित्रपटकर्मींमध्ये पर्यावरणविषयक जाणीवजागृतीच्या दृष्टीने स्पार्क चित्रपट महोत्सव हा महत्त्वाची नांदी ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक आनंद पेंटर यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. फिल्म मेकिंग विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन लि. आणि लक्ष्मी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्पार्क फिल्म फेस्टीव्हल- राज्यस्तरीय पर्यावरण लघुपट/ माहितीपट स्पर्धा-२०२५'च्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. किर्लोस्कर कंपनीचे अधिकारी रमेश चव्हाण, हरिष सायवे आणि शरद आजगेकर प्रमुख उपस्थित होते. दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात राज्यभरातून आलेले एकूण २६ लघुपट आणि माहितीपट प्रदर्शित केले जाणार आहेत.

आनंद पेंटर म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि राजाराम महाराज यांच्या प्रेरणेतून कोल्हापूर हे कलापूर म्हणून प्रसिद्धीला आले. अनेक नामवंत कलाकारांची देणगी या शहराने जगाला दिली. चित्रपटसृष्टीचे मध्यवर्ती केंद्र म्हणून कार्य करताना ते प्रयोगशीलतेचे कोल्हापूर स्कूल ठरले. आता चित्रपटसृष्टी राज्यभरात पसरली असताना कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीला गतवैभव मिळवून देण्याची जबाबदारी नव्या पिढीने घ्यायला हवी. चित्रपट उद्योगाला चांगल्या, कुशल आणि प्रतिभावान कलाकारांची नितांत आवश्यकता आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. फिल्म मेकिंग विभाग मोठे काम करीत आहे, ही महत्त्वाची बाब आहे.

रमेश चव्हाण यांनी स्पार्क फिल्म फेस्टीव्हलमधील सर्वोत्कृष्ट लघुपटांना किर्लोस्करच्या वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित करण्यात येईल, असे सांगितले. हरिष सायवे यांनी किर्लोस्करतर्फे घेण्यात येत असलेल्या विविध जनजागृतीपर पर्यावरणपूरक उपक्रमांना शिवाजी विद्यापीठाचे सहकार्य लाभावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, विद्यापीठाने विद्यार्थ्यांना आवश्यक अशा सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्या सुविधांचा वापर विद्यार्थी त्यांच्या व्यक्तिगत ऊर्जेने कितपत वापरतात, हा भाग फार महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःचे क्षमतावर्धन करीत असताना उपलब्ध सुविधांचा पुरेपूर लाभ घेत आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढवाव्यात आणि चित्रपटसृष्टीत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन केले.

सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. जान्हवी लायकर यांनी परिचय करून दिला. साक्षी वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले, तर स्मित कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. बापू चंदनशिवे, डॉ. अनमोल कोठडिया, लेखक-दिग्दर्शक अनुप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील, डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह राज्यभरातून आलेले लघुपट-माहितीपट दिग्दर्शक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PUBLIC
Notice is hereby given to the
client Mrs. Fareeda Afzal Sayed
Qamaruddin Sayed, had purchase
no. 2 in Shiv Shree Co-Operati
particularly described in the S
Vijaydeep Builders under an Agre
duly registered in the office of t
Thane, under Serial No. 3832/19
After his demise, the share c
said Society have been duly transf
Afzal Sayed, who is in lawful pos
flat.
The original Agreement for
misplaced / lost on 15/12/2025 wh
not be traced despite diligent se
complaint has been lodged at Rab
Registration No. 0004/2026.
Subject to the aforesaid facts,
intending to sell the said flat to an
Any person or persons having
objection whatsoever in respect o
inheritance, succession, agreeme
lease, licence, gift, trust, posse
required to make the same known
documentary evidence, to the
(seven) days from the date of pub
proposed sale shall be completed
shall be deemed to have been wai
THE SCHEDULE AB
Flat no. 2, admeasuring 595 sq.
Shiv Shree Co-Operative Housin

0 3 JAN 2026
सकाळ

# विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे दहा जानेवारीला 'बिगर शासकीय संस्थांचे वित्तीय व्यवस्थापन व लेखांकर' विषयावर व्यवस्थापन विकास कार्यक्रम होत आहे. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी अकरा वाजता त्यास सुरुवात होईल. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत कार्यक्रम होणार आहे. सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, संचालक, सभासद व चार्टर्ड अकाउंटंट, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी तो महत्त्वपूर्ण आहे. सामाजिक संस्थांसाठी निधीचे विविध स्रोत, निधी उभारणी, निधीचा योग्य विनियोग, संस्थांचे लेखांकन, नियमन व अहवालांचे अनुपालन विषयांवर मार्गदर्शन केले जाईल, तरी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

0 3 JAN 2026
पुढारी

# विद्यापीठात १० रोजी व्यवस्थापन विकास कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या वतीने 'बिगर शासकीय संस्थांचे वित्तीय व्यवस्थापन व लेखांकन' या विषयावर व्यवस्थापन विकास कार्यक्रमाचे दि. १० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात आयोजन केले आहे. सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, संचालक, सभासद व चार्टर्ड अकाऊंटंट, शिक्षक व विद्यार्थी यांना हा कार्यक्रम उपयुक्त आहे. सामाजिक संस्थांसाठी निधीचे विविध स्रोत, निधी उभारणी, निधीचा योग्य विनियोग, संस्थांचे लेखांकन, नियमन व अहवालांचे अनुपालन या विषयांवर सत्रांचे आयोजन केले आहे. उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

03 JAN 2026
जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात १० जानेवारीला व्यवस्थापन विकास कार्यक्रम



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या वतीने बिगर शासकीय संस्थांचे वित्तीय व्यवस्थापन व लेखांकन या विषयावर व्यवस्थापन विकास कार्यक्रमाचे आयोजन १० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात करण्यात आले आहे. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, संचालक, सभासद तसेच चार्टर्ड अकाउंटंट, शिक्षक व विद्यार्थी यांना हा कार्यक्रम उपयुक्त असणार आहे. सामाजिक संस्थांसाठी निधीचे विविध स्रोत, निधी उभारणी, निधीचा योग्य विनियोग, संस्थांचे लेखांकन, नियमन व अहवालांचे अनुपालन इत्यादी महत्वाच्या विषयांवर सत्रांचे आयोजन केले आहे. या उपक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

0 3 JAN 2026

पुढारी

# 'नवीन कामगार संहितेचा व्यवस्थापनावरील परिणाम' विषयावर आज कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, अर्थशास्त्र विभाग आणि कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा सॉफ्ट कॉम्पोनंट उपक्रमांतर्गत 'नवीन कामगार संहिता व त्यांचे व्यवस्थापनावरील परिणाम' या विषयावर दि. ३ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजता मानव्यशास्त्र सभागृहात व्यवस्थापन विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमासाठी भारत फोर्ज लिमिटेडचे माजी संचालक डॉ. संतोष भावे, उच्च न्यायालयातील अधिवक्ता व कामगार कायदातज्ज्ञ ॲड. वरुण जोशी, कामगार कायदे विषयातील प्रॅक्टिसिंग वकील दीपक जोशी, ॲड. राजेंद्र चव्हाण, माजी अध्यक्ष, कोल्हापूर बार असोसिएशन यांचा समावेश आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

03 JAN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे ३५० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ३५० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सध्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरु आहेत. शुक्रवारी बीएस्सी., एमबीए., बीएस्सी.बीएड., एमजे., आर्किटेक्चर आदी विविध १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ३५ केंद्रांवर सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला २ हजार ८८ विद्यार्थी उपस्थित होते. दि. ३ रोजी ४७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 JAN 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# स्पार्क फिल्म फेस्टिव्हलचे आज विद्यापीठात उद्घाटन

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग विभागाच्या वतीने आयोजित स्पार्क फिल्म फेस्टिव्हलचे उद्घाटन ज्येष्ठ लेखक आणि दिग्दर्शक आनंद पेंटर यांच्या हस्ते शुक्रवार दि. २ रोजी सकाळी साडेदहा वाजता होत आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन इमारतीत हा फेस्टिव्हल होईल. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. फेस्टिव्हल शुक्रवार आणि शनिवार असे दोन दिवस सकाळी साडेदहा ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत असेल.

स्पार्क फिल्म फेस्टिव्हल अंतर्गत दोन दिवसांच्या पर्यावरणविषयक शॉर्टफिल्म आणि डॉक्युमेन्ट्रीच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला किर्लोस्कर ऑईल इंजिनचे रमेश चव्हाण आणि हरिष सायवे उपस्थित राहणार आहेत. याशिवाय लक्ष्मी फाऊंडेशनचे विनायक देसाई आणि शरद आजगेकर यांची विशेष उपस्थित असेल.

स्पर्धेसाठी २५ दिग्दर्शकांनी फिल्म सादर केल्या आहेत. राज्याच्या विविध भागातून फिल्म आल्या आहेत. सर्व फिल्मचे स्क्रीनिंग करण्यात येणार आहे. तज्ज्ञ परीक्षक फिल्मचे मूल्यमापन करतील.

हा महोत्सव सर्वांसाठी खुला आहे. या फेस्टिव्हलचा आस्वाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बी. ए. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.